# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

"In Pursuit of Technical Excellence"

(0240) 2366101, **e-mail** – workshop@geca.ac.in **web :** www.geca.ac.in


जा.क्र.: शाअमछसं / वि.नोटीस /२०२६/ दिनांक:

## द्वितीय जाहीर निवीदा सूचना :०१(०२).२०२६/ नि. साहीत्य

प्रती,
सर्व संबंधीतास / नोटीस बोर्ड / संस्थेचे संकेतस्थळ

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथील बिगर जडसंग्रह, विनाकामाचे साहित्य, तुटफुट झालेले साहीत्य, भंगार इत्यादीचा विहीत शासकीय पद्धतीने जाहीर लिलाव करून कायमस्वरूपी विल्हेवाट लावण्याचे प्रस्तावित आहे. सदर सामुग्रीचे फोटो सोबत जोडलेल्या **परीशिष्ट - अ प्रमाणे** आहे.
त्या अनुषंगाने संस्थास्तरावरील सर्वसमावेशक समीती तयार करून सदर साहित्य एकत्रीत करणे, तसेच कोणतेही जडसंग्रह नोंद असलेले साहित्य या प्रक्रीयेतून बाहेर जाणार नाही याची दक्षता घेण्या बाबत कारवाईचे लेखी निर्देश करण्यात आले.

बिगर जडसंग्रह निरुपयोगी वस्तू, तुटफुट साहित्य, भंगार, इत्यादी सामुग्री जशी आहे, जेथे आहे त्या स्वरुपात जाहीर लिलाव करण्यात येत आहे. इच्छुक खरेदीदार यांनी सामुग्री ची पहाणी करावी व त्याप्रमाणे दरपत्रक सादर करावे.

**लिलाव प्रक्रीया खालील प्रमाणे आहे.**

१. सदर बाबतीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कर्मशाळा विभागात श्री.चंद्रकांत मारोती पवार, (निदेशक लोहार ९०११८८०२९३) श्री.सुनील कोंडीबा ढगे, (भांडारपाल ८८३०९९५७८४) यांचे कडे संपर्क साधून रु २००० विना परतावा किमतीचे नमुना दरपत्रक विकत घ्यावे लागेल प्रत्येक दरपत्रकाला वेगळा अनुक्रमांक आहे. झेरॉक्स/ सत्यप्रत स्विकारली जाणार नाही. सदर भंगार सामुग्रीचे अंदाजे मूल्य ५०००० इतके आहे.
२. दुकानाचे नोंदनी पत्र, जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, इत्यादी प्रमाणपत्राची सत्यप्रत दरपत्रकासोबत सादर करणे अनिवार्य आहे तसेच अर्ज विकत घेतलेल्या पावतीची सत्यप्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे.
३. प्रत्येक दर पत्रकासोबत रु २०,०००/- इतक्या रक्कमेचा डीडी जोडणे आवश्यक आहे. सुरक्षा ठेव/ अनामत रक्कम सोबत जोडलेले नसल्यास दरपत्रक रद्द समजण्यात येईल. चुकीचे भरलेले, अपूर्ण भरलेले, कागदपत्रे न जोडलेले, असे कोणतेही त्रुटी असलेले दरपत्रक बाद ठरवण्यात येईल.
४. सर्व संबंधीतांनी प्रत्यक्ष येऊन पहाणी करावी, कोणतीही जडसंग्रह वस्तू, त्याचा भाग इत्यादी या लिलाव प्रक्रीयेतून दिली जाणार नाही. लिलाव प्रक्रीया झाल्यानंतर ही असे काही अढळल्यास सदर वस्तू विनामुल्य परत घेण्यात येईल. निवीदाकाराला सर्व सामुग्री स्वत: च्या खर्चाने उचलने व वाहतूक खर्च स्वत: करणे आवश्यक आहे सामान उचलतांना, व वाहतुकी दरम्यान इतर कोणतीही तुटफुट झाल्यास सर्व जबाबदारी निवीदाकाराची असेल. भंगार सामुग्री उचलल्या नंतर त्याठीकाणची अंदाजे एकूण ५०००चौ फुट जागा स्वच्छता करून देणे अनीवार्य आहे.
५. निवीदा विकत घेण्याचा दिनांक २०.२.२०२६ सकाळी १०.३० पासून ते शेवटचा दिनांक २५.०२.२०२६ रोजी सायंकाळी १७.३० पर्यंत आहे. व संपूर्ण भरलेला निवीदा अर्ज सर्व कागदपत्रे व अनामत रकमेसह दाखल करण्याचा शेवटचा दिनांक २५.०२.२०२६ रोजी सायंकाळी १७.३० पर्यत आहे. यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
६. लिलाव समीती मार्फत सर्व निविदा दि. २६.०२.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजता उघडण्यात येतील, यशस्वी निविदाकाराने दि. ०२.०३.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० पर्यत पूर्ण रक्कम भरणे अनिवार्य राहील.
७. महत्तम यशस्वी निविदाकाराने सामुग्री वेळेत न उचल्यास द्वितीय निविदाकरास संधी देण्यात येऊन प्रथम ठरलेल्या निविदाकाराचे अनामत रक्कम/ सुरक्षा शुल्क शासन जमा करण्यात येईल. यशस्वी निविदाधारकास संपूर्ण सामुग्री घेऊन जाणे बंधनकारक राहील.
८. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथील कर्मचारी किंवा त्यांचे नातेवाईक यांना या लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही.
९. लिलाव प्रक्रियेच्या बाबतीत सर्व निर्णय मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे अख्यत्यारीत राखीव करण्यात आलेले आहेत. <u>वरीलपैकी कोणत्याही अटी शर्ती मान्य नसल्यास दरपत्रक सादर करण्यात येऊ नये.</u>

डॉ. संजय एस. डंभारे, प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५